# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर,सदर,नागपूर

दुरध्वनी क्रमांक : २५६५१४३ फॅक्स क्रमांक : ०७१२-२५६१६६३

E-mail:ronagpur.dte@gmail.com Website:www.rdtenagpur.org.in


**महत्वाचे/तात्काळ** क्रमांक:तंशिसं/विकाना/शैवि/**Meritlist**/२०१५/3828

(प्रथमप्राधान्याने) दिनांक: 16 DEC 2015

प्रति,

**प्राचार्य/संचालक/अध्यक्ष/सचिव**

**सर्व पदवी/पदवीका/पदव्युत्तर पदवी**

**विषय : संचालनालयाच्या वतीने राबविण्यांत आलेल्या शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील प्रथम व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र पदवी तसेच एम.बी.ए. एम.सी.ए, एम.टेक पदव्युत्तर पदवी व तंत्रनिकेतन पदवीका अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या पडताळणी मधील तपासणीत आढळलेल्या त्रुटीची पुर्तता करणेबाबत.**

संदर्भ : १. या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिसं/विकाना/शैवि/ MBA-MCAMeritlist/ २०१५/२९६२ दि. १९ सप्टेंबर २०१५

२. या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिसं/विकाना/शैवि/ Pharm/HMCT/Arch Meritlist/ २०१५/३१२२ दि. ०७ ऑक्टोंबर २०१५

३. या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिसं/विकाना/शैवि/ Engg. Meritlist/ २०१५/३२१३ दि. १५ ऑक्टोंबर २०१५

४. या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिसं/विकाना/शैवि/ Poly. Meritlist/ २०१५/३२६२ दि. २३ ऑक्टोंबर २०१५

उपरोक्त संदर्भाकित विषयान्वये कळविण्यात येत आहे की, संदर्भ क्र. ०१ ते ०४ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष पदवीका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या या कार्यालयामार्फत संदर्भाकित पत्रात नमूद केलेल्या विहीत कालावधीमध्ये पडताळणी करण्यांत आलेल्या आहेत.

गुणवत्ता याद्या पडताळणीत आढळून आलेल्या त्रुटींची पुर्तता तात्काळ करण्याचे आपणांस कळविण्यात आलेले असुन सुद्या अद्याप पर्यंत आपल्या संस्थेनी त्रुटीची पुर्तता केलेली नाही.

करीता आपणांस कळविण्यात येते की, तात्काळ **दिनांक १९/१२/२०१५ पूर्वी** त्रुटींची पुर्तता करुन आपण आपल्या संस्थेची गुणवत्ता यादी त्वरीत मुळ प्रतीसह या कार्यालयात सादर करावी. विहीत वेळेत सदर गुणवत्ता याद्यी सादर न केल्यास होणा-या परीणामास संस्थेचे प्राचार्य/संचालक स्वतः जबाबदार राहतील याची गांर्भीयाने नोंद घ्यावी.

( गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर

D:\Nimkar New 2015\Institute Letter_Balki.Docx